# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित १
- कवी / कवयित्रीचे नाव :- पदमनाभ प्रकाश भागवत

---

छेडील्या तारा अंतरीच्या लयीच्या
गाभारा फुलतो भावविश्व मनाचा
आळविता सुर दूरून कानी येती
नकळत गस्त बहु अंतरी घालिती

सुस्वर गुंजन कर्ण पल्लवी येता
जीवास छेडे सुर मधुर अमृताचा
अनाहताचा गंधार हलकेच येतो
स्वरब्रह्म अनादी मनांतरी शिरतो

पंचम वर्ज्यूनि राग स्वरूपी मारवा
राग आगळे साद घालीती मनाला
सुरेल सप्तकाची धुंद फिरता गती
सप्तरंग नभिचे थाट शोभे सुरांसी

सहोदर वेदांचा नादब्रह्म विभूती
श्रुतीभाव गान सामवेद मधुपुष्पी
नेति नेति स्वर, घडे अमृतानुभूती
योगयुक्त भावरस प्रवाहे तरंगती

सामगंध सूरेल आळविते वैखरी
भावोत्कट नाद झंकारले हृदयी
एक तान अशी तरळली अंतरी
छेदून काळजास प्रगटते समेवरी

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

स्वरचित २ (द्वितीय  क्रमांक विजेती कविता)

मुखी नित्य आळवावे
सुर सुरात गावे

अर्पून नित्य सेवा
सुर संगती जावे

स्वर सप्तकातील
मनी असे स्फुरावे

दिव्य सुर कानी
पुन्हा पुन्हा स्मरावे

सप्त सुर गळा
माळून घ्यावे

तान गळ्यातील
ध्यान तेची व्हावे

दशनाद अखंड योगे
अनाहताचे यावे

साधना फळास यावी
आशिष सुर व्हावे

Anahat Music Therapy

'स्वरचित' - काव्य स्पर्धा

स्वरचित ३

स्वयमेव स्वयंभू संगीत चराचरातील
अनंत नाद मधुर येती मना मनातील
कशी गावी ऐकावी महती या सुरांची
शब्दसाज, सुर तरल काळजातील

भारले शब्द, गंध चढतो सुरेल सुरांनी
सुर साज शब्दास त्या कवी मनातील
गीत अलवार उमलते फुल मनातील
विसरून देहभान ऐकी जीव चरातील

अनादी, न सापडे अंत मोहक सुरातील
सारे अर्पून जाणंण्या संगीत चरातील
विश्व् ओथंबले सुर ऐकोनी अनाहताचे
परी तो झटतो पुजतो दैवी सप्तसूरांसी

Anahat Music Therapy

स्वरचित ४

कला अशी गायनी
भवभंजना सुखववते ....
उतरते रसिक मन मंदिरी

सुखाचे भरते भाव मनीचे
रस, ऋतूं अन दिनमानाचे
सहृदायांशी रंगते फुलते
श्रुती सुरांतून खुलून ये नाते

ब्रह्मरूप, आनंद रूप हे
अभिव्यक्तीचे कारण रूप हे
लोकोपदेशे साधन आणि
मोक्षपदासी अलगद नेते

राग रागिणी सुंदर नाते
ध्वनी भेद अन युक्त सुरांचे
कर्णरंध्रास सुखवीत जाते
उतरते रसिक मन मंदिरी

तपोवनीच्या संगीत धारा
श्रावण भक्तीच्या व्यासंगाला
नाद भेद स्वर मालेची
स्वर संवादी अशी मांडणी

Anahat Music Therapy

‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

स्वरचित ५

माना डोलती काया नाचे
कानी पडता जीव गलबले

रोमांच उभे स्फुरण चढे
डोळे तरळून स्तब्ध उभे

मुकी जिव्हा अवाक होते
आवंढा अन स्फुट हुंदके

वेळ काळ भान जगीचे
नूरे व्यवहार न उरे नाते

घडते सारे सात सुरांच्या
राग रागिनीच्या अद्वैताने

Anahat Music Therapy